# नव्या युगासाठी प्रबोधन

(स्फुट लेखसंग्रह)

**भाग १**

**डॉ. प्रा. जे. बी. शिंदे**

**रिया पब्लिकेशन्स्**

**नव्या युगासाठी प्रबोधन – भाग १ : डॉ. प्रा. जे. बी. शिंदे**

© **सौ. विजया ज. शिंदे**
साळोखे नगर, कळंबा रोड, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २३२४०५१.
मोबाईल : ९२२५८०९०७१.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ३२०/-

'चित्रलेखा' साप्ताहिकाचे संपादक

**माननीय ज्ञानेश महाराव**

आणि

'चित्रलेखा' साप्ताहिकाचे संचालक

**कोटक परिवार**

यांच्या पुरोगामी दृष्टिकोनास सादर अर्पण.

# दोन शब्द प्रारंभीचे

फेब्रुवारी २००४ या वर्षी बागल विद्यापीठाचे प्रबोधन कार्यकर्ता शिबिर पन्हाळ्यावर घेण्यात आले होते आणि त्या शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी चित्रलेखा साप्ताहिकाचे माननीय संपादक ज्ञानेश महाराव यांचे बीजभाषण होते. प्रबोधन हा शब्द माझ्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यात पुरोगामी विचारवंत महाराव यांचे भाषण असा दुर्मिळ योग साधण्यासाठी मी शिबिरार्थी झालो.

त्याआधी माझे 'नव्या युगाचे अभंग भाग पहिला' व 'माझे परिवर्तनवादी अभंग भाग दुसरा' प्रकाशित होऊन पुरस्कृतही झाले होते. त्या दरम्यान चित्रलेखाचे प्रारंभीचे पान माझ्या पाहण्यात आले होते आणि आपणही तसे लेखन करावे असे मला मनापासून वाटले होते म्हणून शिबिराला जाताना मी माझे दोन्ही अभंग आणि चित्रलेखासाठी नमुना लेखन अशा तयारीने गेलो.

संपादक महारावांचे भाषण झाले. त्यांचा पुरोगामीपणा आणि विचारमांडणीतील आक्रमकपणा (Energy) मला फारच आवडली. भाषण संपवून ते स्टेजवरून खाली आले. मी पुढे जाऊन त्यांना अभंग संग्रह, नमुना लेखन दिले आणि अभिप्राय द्यावा अशी विनंती केली. महिन्यानंतर त्यांचा फोन आला. माझे लेखन त्यांना पसंत पडले होते. आठ-दहा दिवसांनी मी चित्रलेखाचे पहिले पान पाहिले. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. पृथ्वीवर स्वर्गीय अनुभव कसा असतो ते मला उमजले. संपादक महारावांनी मला जी प्रसिद्धी मिळवून दिली होती ती माझ्या आवाक्याच्या बाहेरची, कल्पनेच्या पलीकडची होती. आपली बौद्धिक उंची मोजावी की महारावांची गुणग्राहकता मोजावी या संभ्रमात मी पडलो होतो. सुरवंटाचे फुलपाखरात रूपांतर करणारे किमयागार म्हणूनच आजही महाराव मला थोर वाटतात. न फिटणाऱ्या उपकाराची भाषा महारावांच्या संदर्भात मी सतत करीत आलो आहे आणि ती भाषा माझ्या जिभेवर कायम राहील.

पुरोगामित्वाचे नाणे कसे खणखणीत असावे ते महारावांकडून मी शिकलो. माझे विचार लब्धप्रतिष्ठांनी अव्हेरले होते हेही मला कळाले होते. अशा अवस्थेत माझ्या विचारांना दर्जेदार व्यासपीठ देऊन ज्ञानेश महारावांनी माझी निराशा, मरगळ दूर केली होती.

एप्रिल २००४ पासून आजपर्यंत दोनशे पन्नासहून अधिक प्रबोधनपर लघुलेख आणि त्यासंबंधीचा अभंग असे साहित्य प्रकाशित झाले. सामाजिक जाणिवेतून मी लिहू लागलो. अनेक विचारी व्यक्तींनी प्रबोधनाचे स्वागत केले आहे. त्यांच्यासाठी लिहीत राहावे असे वाटते, हे फार मोठे समाधान महारावांनी मला मिळवून दिले.

आज जिज्ञासू माणसे संख्येने वाढत आहेत. त्यांना भारतीय समाजातील आस्तिकवाद-नास्तिकवाद, श्रद्धा श्रेष्ठ की बुद्धी श्रेष्ठ, पाप-पुण्याच्या धार्मिक संकल्पना आणि त्यांचे सामाजिक अर्थ, आध्यात्मिक प्रदूषण विरुद्ध पुरोगामीपणाचा प्रदूषण निवारण कार्यक्रम, अंधश्रद्धा आणि रूढी-परंपरा या सर्वच गोष्टी गोंधळून सोडताहेत, बुद्धिवाद कसा जोपासायचा हे कळणे कठीण आहे. चित्रलेखातील 'प्रबोधन' वरील विषयासंबंधी काही विचार मार्गदर्शनासाठी देते. काहींची त्यामुळे जिज्ञासातृप्ती होते ही फार मोठी फलप्राप्ती आहे असे मी मानतो. या फलप्राप्तीत संपादक महाराव यांचा वाटा सिंहाचा आहे.

अजब प्रकाशनचे तडफदार शीतल मेहता यांनी पुस्तक रूपाने प्रबोधन समाजापर्यंत पोहोचविण्याचा उत्साह आणि तळमळ दाखवली याबद्दल त्यांचे, त्यांचे ज्येष्ठ बंधू राहुल मेहता आणि पिताजी उल्हास मेहता यांचा मी ऋणी आहे.

कोल्हापूर
मे २००९

**– डॉ. जे. बी. शिंदे**

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **थोर व्यक्तीविषयक :** | | |
| १) | जिजामातांचे पुण्यस्मरण | ११ |
| २) | महात्मा फुले-डॉ. आंबेडकर | १४ |
| ३) | क्रांतिज्योती सावित्री | १८ |
| ४) | छत्रपती राजर्षी शाहू | २२ |
| ५) | क्रांतिकारक राजा : छ. शाहू | २५ |
| ६) | महात्मा गांधी | २८ |
| ७) | श्रीकृष्ण, महात्मा बुद्ध | ३१ |
| **सामाजिक प्रबोधन :** | | |
| **अ)** | **दिनविशेष :** | |
| १) | महाराष्ट्र दिन | ३४ |
| २) | नववर्ष स्वागत | ३७ |
| ३) | नववर्षारंभ | ४१ |
| ४) | नववर्षाचे संकल्प | ४५ |
| ५) | तिळगूळ दिन | ४८ |
| ६) | रूढींचे सीमोल्लंघन कधी? | ५२ |
| ७) | दिवाळी विशेष | ५५ |
| ८) | गणतंत्रदिन विशेष | ५९ |
| ९) | बालदिन | ६३ |
| १०) | ज्येष्ठ नागरिक | ६६ |
| ११) | आरोग्यदिन | ६९ |
| १२) | जागतिक स्त्री दिन | ७२ |
| १३) | हिंदी दिनाचा संदेश | ७५ |
| **ब)** | **देश-राष्ट्र-लोकशाही, मतदान** | |
| १) | सज्जन-दुर्जन | ७८ |
| २) | गरिबी हटाओ | ८१ |
| ३) | मतदान श्रेष्ठ दान | ८४ |
| ४) | जशी जनता तसा नेता | ८७ |

५) भूतकाळ भूषण भारत ९०
६) मालकी हक्काचे जंगल ९३
७) तंटामुक्तीचे वास्तव! ९६
८) हे राष्ट्र माणसांचे! ९९
९) जाती मोडा, देश जोडा १०२
१०) लोकशाही की अंधारशाही? १०५
११) भारत : तोतयांचा देश १०८
१२) नेता असावा पुरोगामी १११
१३) सज्जन संघाची गरज ११४

**जीवनविषयक : (शरीर, मन, संसार, मैत्री, इहवाद, आशा-निराशा, शौर्य, उदारपणा, ध्येय)**

१) अहंकाराचा त्याग ११७
२) सत्य आणि असत्य १२०
३) कर्ममग्नतेचे लाभ १२३
४) निर्लोभी व्हा १२६
५) दातृत्वाची थोरवी १२९
६) गप्पांची व्यर्थता १३२
७) क्रोध हा शत्रू १३५
८) निसर्गप्रेम १३८
९) स्वसामर्थ्याने उन्नती १४१
१०) ध्येय ठेवा, पुढे जा १४४
११) जीवेत् शरद: शतम् १४७
१२) संधी साधा, मोठे व्हा १५०
१३) पुरुषार्थाची साधना १५३
१४) कळण्यापासून वळण्यापर्यंत १५६
१५) मनुष्यमित्र व्हा १५९
१६) आत्मसन्मान करा सदोदित १६२
१७) जगदुद्धारिणी स्त्री १६५
१८) साहस हवे विधायक १६८
१९) इहवादाकडे चला...! १७१
२०) एक नूर आदमी दस दूर कपडा १७४
२१) वृद्धांना हितबोध १७७
२२) सुखस्वप्ने अन् दु:स्वप्ने १८०
२३) निराशेचा रोग १८३
२४) बोलण्याचे धाडस १८६
२५) मद्यपान? छे: विषपान १८९
२६) शहरी मानव की यंत्रमानव? १९२
२७) मृत्यूचा धिक्कार करा १९५
२८) संघर्ष-प्रेम जोपासा १९८
२९) शिस्तपालनाची निकड २०१
३०) मैत्री माणसाशी करावी २०४
३१) मानसिक आरोग्य वाढवा २०७
३२) आत्मविश्वासाने जगा २१०
३३) चिंता असावी दर्जेदार २१३
३४) स्वत:शी मैत्री करा! २१६
३५) सत्यशोधक व्हावे! २१९

**देवधर्मविषयक (देव, धर्म, पुराणे, आत्मा, उत्सव इ.)**

१) प्रार्थनेचे साध्य खोटे २२२
२) श्रद्धेचा पुनर्विचार २२५
३) काशी हा नरकवास २२८
४) मन हाच ईश्वर! २३१
५) देवभक्तांची फजिती २३४
६) अध्यात्मवाद्यांचा भ्रम! २३७
७) अध्यात्मवादी? छे: मिथ्यावादी! २४०
८) हे राष्ट्र माणसांचे! २४३

**साहित्य-कलाविषयक (ज्ञान, भाषा, साहित्य, शिक्षण इ.)**

१) ज्ञान माहात्म्य २४६
२) प्रबोधन माहात्म्य २४९
३) बुद्धिवादाचे महत्त्व २५२
४) संस्कृत की मराठी? २५५
५) बुद्धिवादाचे माहात्म्य २५८

६) अभिव्यक्तीचे माहात्म्य २६१
७) विचारांचे महत्त्व २६४
८) खरा साहित्यिक २६७
९) सार्वत्रिक शिक्षण आहे कोठे? २७०
१०) ब्राह्मणी इतिहास! २७३
११) गणिताचा ध्यास घ्या! २७६
१२) संशोधनाची दिशा आणि दशा २७९
१३) मराठी भाषा उपेक्षित! २८२
१५) अज्ञानातील सुख खोटे! २८५
१६) बुद्धिमंतांचे दुहेरी सामर्थ्य २८८
१७) बुद्धीने चला तेजोयुगाकडे २९१
१८) ज्ञान-अज्ञानाची रस्सीखेच २९४

**अंधश्रद्धा निर्मूलन (बुवाबाजी, रूढी, परंपरा, नवस इ.)**

१) कर्मकांड निषेध २९७
२) पितरपूजेचे थोतांड ३००
३) रूढींचा निषेध ३०३
४) निषेध भाग्यवादाचा! ३०६
५) आयुर्वेदातील बुवाबाजी ३०९
६) शास्त्रीय गायनाचे वेड! ३१२
७) बुद्धीची कुऱ्हाड चालवा ३१५
८) हिंसा-अहिंसेतील मध्यम मार्ग ३१८
९) समाजपीडक गणेशोत्सव ३२१
१०) योगाच्या मर्यादा ३२४
११) चिकित्सक व्हा! ३२७


✦✦

# जिजामातांचे पुण्यस्मरण

आईच्या कर्तृत्वातच मुलाचं भाग्य लपलेलं असतं असं जगज्जेता नेपोलियन म्हणाला. त्याचा विचार स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांना तंतोतंत लागू पडतो. कारण त्यांना जवळपास आयुष्यभर सातत्याने आपल्या महान मातेचं सुयोग्य मार्गदर्शन सुदैवाने लाभले. छत्रपती शिवरायांना कुणीही हिंदवी स्वराज्य संस्थापक किंवा गोब्राह्मण प्रतिपालक अशा धर्मभेदजन्य किंवा जातिभेदजन्य मर्यादांनी संकुचित करू शकणार नाही इतकं विशालतम, अमर्याद उत्तुंग आणि देदीप्यमान व्यक्तिमत्त्व जिजाऊ माँसाहेबांनी आपल्या अव्याहत चिंतन, मनन आणि प्रजाहित रक्षणाच्या ध्यासाने घडवलं होतं. म्हणून तर आज जिजामातेच्या नावाला 'जय जिजाऊ असं' अभिवादनमूल्य प्राप्त झालं आहे.

राजमाता जिजाऊंचा इतिहास हा नवयुग निर्मितीचा इतिहास आहे. छत्रपती शिवरायांचे प्रखर, तेजस्वी चरित्रशिल्प घडवणारे राजमातेचे हात जितके हळुवार होते; तितकेच कर्तव्यकठोरही होते. हिरकणीचा सत्कार करण्यामागची प्रेरणा त्यांचीच होती आणि रांझ्याच्या कामांध पाटलाचे हातपाय कलम करण्याचा आदेशही त्यांचाच होता. आपल्या नातवाच्या दूधआईच्या रोजीरोटीची चिंता कायमची दूर करणाऱ्या मृदुल मनाच्या जिजाऊ अफझलखानाच्या भेटीसाठी शिवबाला तयार करण्याइतक्या मनानं खंबीरही होत्या.